संत ज्ञानेश्वर सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षानिमित्त मराठी अध्ययनशाखा, संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन आणि डिजिटल अध्यापन आणि संसाधन संचालनालय यांच्या सहकार्याने ***'गोमंतकीय मराठी भक्तिकाव्य धारा'*** या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित केली.

या परिषदेत संत सोहिरोबानाथ आंबिये, संत कृष्णंभट्ट बांदकर, कवी मंगेश, सोंसूबाई आणि जीवनमुक्त महाराज या गोमंतकीय संतांच्या अभंगांचे सुश्राव्य ध्वनिचित्र-मुद्रण आणि संशोधित ई-साहित्याचे 'लोकार्पण' झाले.







